# गेवराई नगर परिषद गेवराई,जिल्हा बीड

Ph.No(02447)262015 Fax:263515 Email:mcgeorai@gmail.com


जा.क्र./का.वि/ 712/2026 दिनांक: 10/06/2026

## भोगवटा प्रमाणपत्र (वापर परवाना)

नगर परिषद, गेवराई न.र. विभाग

प्रति,

श्री. सय्यद नवीद आजम सय्यद युसुफ ,

रा.गेवराई.

**विषय: इमारत वापर प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

संदर्भ: १) अर्जदार श्री. सय्यद नवीद आजम सय्यद युसुफ यांचा अर्ज दि. ३१०५/२०२६ दि.०३/०६/२०२६ .

२)या कार्यालयाने यापूर्वी मंजूर केलेली बांधकाम परवानगी जा.क्र./GMCWS/बां.वि./१३५१/२०२१ दि. २०/०८/२०२१

३ ) नोंदणीकृत अभियंता श्री. फैजान इसाक शेख यांचा बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दि .०२/०५/२०२६

गेवराई नगर परिषद हद्दीतील **स.नं.८३/अ** घर क्र. ३४६२ येथे संदर्भ क्र. २ नुसार रहिवास वापरासाठी या कार्यालयाने अर्जदारास बांधकाम परवानगी दिली आहे. GROUND FLOOR : १२४.३ चौ मि.. व FIRST FLOOR B/U :(१२४.३ चौ मि.), एकुण बांधकामाचे क्षेत्रफळ : २४८.६ चौ.मी इतके रहिवास वापरा करिता इमारतीचे बांधकाम करणेस सुधारित बांधकाम परवानगी दिली आहे. त्यानुसार मंजूर बांधकाम नकाशाप्रमाणे इमारतीचे बांधकाम मजबुत, अग्निरोधक रीतीने पूर्ण झाल्याबाबत संबंधित कामाची देख रेख करणारे नोंदणीकृत अभियंता श्री. फैजान इसाक शेख यांचा दाखला जोडून अर्जदार यांनी सदर इमारती करिता वापर प्रमाणपत्र मिळावे म्हणून संदर्भीय अर्जान्वये विनंती केली आहे.

त्यानुसार नगर परिषदेकडून सुधारित बांधकाम परवानगी घेऊन बांधलेल्या सदर इमारतीच्या वापरास खालील अटींच्या अधीन राहून वापर परवानगी देण्यात येत आहे.

१.सदर इमारतीचा वापर बांधकाम परवानगी प्रमाणे दिल्यानुसार करावा.

२.भविष्यात इमारतीच्या वापरात अगर रचनेत कोणताही बदल करावयाचा असल्यास एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० नुसार नगरपरिषदेकडून परवानगी घेणे आपणास बंधनकारक आहे..

३. सदर इमारतीच्या ठिकाणी मंजूर व्यतिरिक्त कोणतेही नवीन अगर वाढीव बांधकाम,वापरात बदल आढळून आल्यास सदरचा विकास हा अनधिकृत समजण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४.सदरच्या इमारतीच्या ठिकाणी निर्माण होणारे सांडपाणी.व कचऱ्याची विल्हेवाट योग्य रीतीने लावण्याची जबाबदारी अर्जदार यांची आहे. त्यामुळे आजुबाजूच्या कोणत्याही कोणत्याही नागरिकांना उपद्रव होणार नाही याची नोंद घ्यावी.

५. भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यावर नगर परिषदे मध्ये सदरील बांधकामाची नोंद घ्यावी. गेवराई नगर परिषदेकडे भरणा करावे लागणारे सर्व कर नियमित व वेळेत भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

६.इमारतीमध्ये अग्निशमन व्यवस्था करावी व त्याचे वार्षिक अहवाल कार्यालयास दाखल करावी.

७.संबंधित इमारतीत खाजगी व्यवसाय/व्यापार यासाठी संबंधित शासकीय विभागाची परवानगी आवश्यक राहील.

८.सदरील इमारतीमध्ये लिफ्ट ची व्यवस्था करावयाची असल्यास सबंधित विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. संबंधित विभागाची परवानगी घेतल्याशिवाय लिफ्ट चा वापर करू नये.

**९. हे भोगवटा प्रमाणपत्र संदर्भ क्र.२ मधील मंजूर बांधकाम नकाशाकरिता देण्यात येत आहे त्यामुळे या पत्रासह नकाशे स्वतंत्रपणे मंजूर करण्याची आवश्यकता नाही.तरी पुढील कार्यवाहीकरिता मंजूर बांधकाम नकाशा पाहण्यात यावा.**

वरील अटींचे उल्लंघन केल्यास किंवा सदर अर्जासोबत सादर केलेली माहिती खोटी आढळून आल्यास सदर वापर परवाना रद्द समजण्यात येईल.

(विक्रम पुष्पा मारुतीराव मांडुरके )
(विक्रम मांडुरके)
मुख्याधिकारी
नगरपरिषद गेवराई

प्रत:

१. कर विभाग प्रमुख,न.प.गेवराई यांना अर्जदाराच्या बांधकामास मालमत्ता कर लावणे व मालमत्ता प्रमाणपत्रावर नोंद घेणे करिता देण्यात येत आहे.